# भुयारी मार्ग शोधा 'ट्विटर'वरून

## मेट्रो ३ मार्गिकेवरील स्थानकांची माहिती देण्यासाठी मोहीम

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** आरे ते कफ परेड या भूमिगत मेट्रो मार्गिका उभारणीचे काम झपाट्याने सुरू आहे. यामध्ये जमिनीवरून या भुयारी स्थानकांत प्रवेश कुठून आणि कसा करायचा, हे प्रवाशांना व मुंबईकरांना ट्विटरद्वारे सांगितले जात आहे. ही मार्गिका विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) हाती तशी मोहीम घेतली आहे.

मेट्रो ३ ही आरे ते कफ परेड, अशी राज्यातील पहिली भूमिगत मार्गिका आहे. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी हा डिसेंबर २०२३पर्यंत सुरू करण्याचे लक्ष्य आहे. त्यादृष्टीने भुयारी स्थानकांची उभारणी झपाट्याने होत आहे. या स्थानकांत जमिनीवरून नेमका प्रवेश कुठून करावा, याबाबत संभ्रम होऊ नये यासाठी #HumPaasPaasHain ही मोहीम हाती घेतली आहे.

'एमएमआरसी'ने ही मोहिम ट्विटवरील @MumbaiMetro3 या नावाच्या त्यांच्या खात्यावरून सुरू केली आहे. त्यामध्ये गुगल नकाशाचा उपयोग करुन स्थानकांमध्ये कुठल्या बाजूने प्रवेश करायचा, त्यासाठी सरकता जिना असेल की लिफ्ट, आदी माहिती रंगानुसार दाखविण्यात आली आहे.

सध्या या मोहिमेत आरे डेपो व सीप्झ या स्थानकांची माहिती देण्यात आली आहे. स्थानक हिरव्या रंगात तर स्थानकातील प्रवेश लाल रंगात दर्शविण्यात आला आहे. तसेच या स्थानकाजवळील महत्त्वाच्या ठिकाणांची माहितीही आहे. त्या ठिकाणाहून स्थानकात कसे यायचे, त्याचे भौगोलिक स्थानही दर्शविण्यात आले आहे. मार्गिका सुरू होण्याआधी पहिल्या टप्प्यातील सर्व स्थानकांची ओळख प्रवाशांना व्हावी, हा यामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे.

### 'सहार'ची रचना कात्रीसारखी

या मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यातील सहार स्थानक हे आगळे असेल. या स्थानकात मार्ग परिवर्तन करणे शक्य असेल. अप दिशेच्या गाड्यांना डाऊन दिशेकडे वळविणे किंवा उलट, हे या स्थानकाजवळ करता येणार आहे. त्यासाठी स्थानकाजवळील गोलाकार भुयारात दोन मार्गिका या 'कात्री'सारख्या आकारात उभ्या करण्यात आल्या आहेत. त्यासंबंधीची महत्त्वाची रचना एमएमआरसीने पूर्ण केली आहे. पहिल्या टप्प्यासाठीची तयारी प्रशासनाने जोमाने सुरू केली आहे

